# इथिओपिया, इराण

## पुरन्दरे चन्द्रशेखर

**इथिओपिया**

हा देश पूर्व आफ्रिकेत आहे. लोकसंख्या सुमारे ११ कोटी आहे. लोकसंख्येनुसार तो आफ्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे [नायजेरिया - १४ कोटी]. ८० हून अधिक जनजाती [tribes] तेथे आहेत. त्यांच्या अस्मिता निराळ्या असतात व केंद्रीय सत्तेच्या विरोधात त्या विविध प्रकारे व्यक्त होतात. कधी निवडणुकातून, कधी हिंसाचारातून. हा प्रक्रिया भारतासारखी आहे.

उत्तर इथिओपियात टेग्रे नावाचे राज्य आहे. त्यातील लोकांना टेग्रीन म्हणतात. नोव्हेंबरपासून तेथे सरकारी फौजा विरुद्ध टेग्रीन मुक्ती आघाडी यांच्यात युद्ध सुरु झाले. ४ नोव्हेंबरला ठिणगी पडली. त्या सुरुवातीसाठी दोन्ही बाजू दुसऱ्या बाजूला दोष देतात. २८ नोव्हेंबरला सरकारने एकतर्फी युद्धविराम जाहीर केला. तो टेग्रीनला मंजूर नाही. यात कोणत्याही युद्धात होते तशी निष्पाप जीवितहानी इथेही झाली आहे. युद्ध सुरु झाल्यापासून संपूर्ण प्रदेशातील इंटरनेट बंद करण्यात आले, प्रत्यक्ष परिस्थिती पहाणेही अशक्य करण्यात आले. त्यामुळे खरोखर किती मरण पावले असतील याचे अंदाजच आहेत. तेही हजारात जातात. युद्धामुळे हा प्रदेश सोडून शेजारच्या सुदान देशाला निर्वासितांचा ओघ सुरू झाला. ते लाखात जातील. प्रथम सुदानने त्यांच्यासाठी छावण्या उभारल्या. पण ओघ आटेना. मग सुदानने त्याची सीमा बंद केली व इथिओपियन सरकारनेही. मानवी वेदना आणखी तीव्र झाली. निर्वासित जाणार कोठे ?

टेग्रीन इथिओपियाच्या एकूण लोकसंख्येच्या ६ टक्के आहेत [दुसऱ्या अंदाजानुसार १० टक्केपर्यंत म्हणजे सुमारे एक कोटी] सध्याचे सरकार २०१६ला अस्तित्वात आले. त्या आधी अल्पसंख्य असूनही '९१ पासून टेग्रीन सरकारमध्ये निर्णायक भूमिकेत होते. नव्या सरकारच्या आगमनानंतर हे स्थान अचानक गेले. त्यामुळे टेग्रीन केंद्राविरुद्ध झाले. संघर्षाचे हे कारण. आता थोडी पार्श्वभूमी पाहू.

इथिओपियाच्या उत्तरेला आता एरिट्रिया नावाचा देश येतो. तो इथिओपियाचा भाग नव्हता पण '६२ साली इथिओपियाने गिळंकृत केला. तेव्हापासून एरिट्रियाचा इथिओपियाशी संघर्ष सुरु झाला. तो १९६१ पासून १९९१ पर्यंत सतत चालला. नंतर थोड्याफार वाटाघाटी झाल्या पण त्या अयशस्वी झाल्या. ['९३ला एरिट्रिया स्वतंत्र राष्ट्र झाले. ते पुढे पाहू.] मग '९८ ते २००० या वर्षांत तीव्र युद्ध झाले. त्यात दोन्ही बाजू मिळून दोन-तीन लाखावर बळी गेले. एका अंदाजानुसार त्यात दोघांनी प्रत्येकी दररोज दहा लाख डॉलर्स शस्त्रांवर खर्च केले. टेग्रीनचाही एरिट्रिया स्वतंत्र असण्याला विरोध होता. शिवाय टेग्रे प्रदेश एरिट्रियाला लागून असल्याने त्यांचे विरोधातील योगदान महत्त्वाचे होते. हा या पार्श्वभूमीचा एक पदर.

दुसरा म्हणजे या एरिट्रियाबरोबरच्या संघर्षादरम्यान इथिओपियात रशियाच्या पाठिंब्याने १९७४ साली कम्युनिस्ट उठाव झाला. ही कम्युनिस्ट राजवट [तेव्हा इथिओपियात असणारे] एरिट्रियन्स व इथिओपिया - त्यात टेग्रीनचा पुढाकार होता - यांना अमान्य होती. त्यांनी एकत्र येऊन या राजवटीविरुद्ध संघर्ष सुरु केला. पुढे सोविएत युनिअनच्या अस्तानंतर रशियाने काढता पाय घेतला व ती राजवट '९१ साली कोसळली. म्हणजे एरिट्रियन्स व टेग्रीन कम्युनिस्टांविरुद्ध काही काळ एकत्र आले.

या पार्श्वभूमीच्या संदर्भात एक विशेष गोष्ट नमूद करायला हवी. इथिओपियाच्या घटनेनुसार, कोणत्याही प्रदेशाला जर देशापासून विभक्त व्हायचे असेल, स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात यायचे असेल तर ती तरतूद आहे. त्या प्रदेशातील सार्वमताने जर हा कौल दिला तर केंद्र त्याच्या आड येत नाही. या घटनात्मक तरतुदीच्या आधारे, एरिट्रियात सार्वमत घेण्यात आले होते. त्यात बहुतांशी मतदारांनी इथिओपियापासून विभक्त व्हावे असे मत




दिले. मग एरिट्रिया '९३ ला स्वतंत्र राष्ट्र झाले. संयुक्त राष्ट्रसंघातही त्याचा प्रवेश झाला.

परत २०१८ पर्यंत दोन्ही देशात अनेक वाटाघाटी, युद्धे झाली. शेवटी २०१८ला तह झाला. त्यात सीमेवरचा काही भाग वादग्रस्त निघाला. म्हणजे, पन्नास-साठ वर्षे युद्ध, काही लाख मृत्यू, गरीब राष्ट्रांना न झेपणारा कोट्यवधी डॉलर्सचा शस्त्रात्रांवरील खर्च याचे हे निष्पन्न. शस्त्रास्त्रांवरील खर्चाने पश्चिमेतील त्या कंपन्यांना मात्र लाभ झाला.

परत सध्याच्या युद्धाकडे वळता, नोव्हेंबरला त्यांच्याबरोबरचे युद्ध संपल्याचे केंद्राने जाहीर करूनही गनिमी काव्याने युद्ध चालूच ठेऊ असा टेग्रीनचा दावा आहे. यात एरिट्रिया, सुदान यांचा अप्रत्यक्षरीत्या टेग्रिन किंवा इथिओपियन केंद्र सरकार यांच्या बाजूने हस्तक्षेप होणार. मग प्रादेशिक अशांतता वाढत रहाणार असे दिसते. एरिट्रियाने अलीकडच्या युद्धात इथिओपियाला मदत केली असावी. प्रत्युत्तर म्हणून टेग्रीनने अस्मारा या एरिट्रियाच्या राजधानीवर रॉकेट्सचा हल्ला केला. हे संघर्ष वाढले तर इतर जमाती स्वायत्ततेकडून स्वातंत्र्याकडे वळण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर जमातींची एकमेकांशी असलेली पूर्वापारची दुश्मनीही हिंसक होत आहे. टोकाला इथिओपियाचे विभाजन होईल. अशांततेचे या देशांबाहेरील परिणामही गंभीर होतील. उदा. शेजारच्या जिबूतीमध्ये अमेरिकन लष्करी तळ आहे. त्याला संभाव्य धोका अमेरिका स्वीकारणार नाही. वगैरे.

एकूण युद्धाचे वैफल्य परत सिद्ध झाले आहे. इथिओपियातील घटनात्मक तरतूद बोधप्रद आहे. [अशा तरतुदीचा भारतीय संविधानासंदर्भात विचार व्हायला हवा.] संकुचित सामूहिक अस्मिता आणि राष्ट्रीय राजकारण यातील द्वंद्वही समोर आले आहे.

**इराण**

इराणमधील दोन घटना पाहू. त्यांतील तात्त्विक तणाव लक्षात यावा.

इराणच्या अणुप्रकल्पातील एका वरिष्ठ शास्त्रज्ञाची २७ नोव्हेंबरला इराणची राजधानी तेहरान येथे हत्या झाली. त्यामागे इस्राएल, अमेरिका, इराणी राजवटीचे इराणी विरोधक यांचा हात असावा असे इराणचे म्हणणे. जानेवारीत इराणच्या विशेष सैन्यपथकाच्या प्रमुखाची बगदादमध्ये हत्या झाली *[आंदोलन, फेब्रु. २०२०]*, या ऑगस्टमध्ये अल-कईदाच्या एका वरिष्ठ नेत्याची तेहरानमध्ये हत्या झाली. या हत्यांमुळे इराणमध्ये खळबळ माजली आहे. राज्यकर्त्यांच्या सक्षमतेविषयी संशय येत आहे. इराणच्या राजकारणात दोन तट आहेत. एक जहाल दुसरा मवाळ. जहाल गटाच्या मते अशा कृत्यांचा जबाब अशाच हिंसक कारवायांनी दिला पाहिजे. म्हणजे इस्राएल, अमेरिका यांच्यावर शक्य ते हल्ले केले पाहिजेत. मवाळ गटाच्या मते तसे करणे इराणच्या हिताचे नाही. आधीच इराणवर जाचक आंतरराष्ट्रीय निर्बंध आहेत, ते वाढतील व अर्थव्यवस्था आणखी दुबळी होईल.

या हत्येचे प्रमुख कारण म्हणजे इराणची अणुक्षमता. ओबामा अध्यक्ष असताना इराणने २०१५ ला आपला अणु-प्रकल्प अणुबॉम्ब निर्मितीसाठी नसेल असा आंतरराष्ट्रीय करार केला होता. [त्या भूमिकेवर इस्राएल, सौदी अरेबिया यांचा विश्वास नाही.] या करारातून अमेरिका २०१८ला ट्रम्पच्या दुराग्रहाने बाहेर पडली. मग इराणने आपणही कराराला बांधील नाही असे जाहीर केले. युरोपचा प्रयत्न तरीही इराणशी सलोख्याचे सम्बन्ध ठेवण्याचा राहिला. कारण ट्रम्पसारख्या धोरणाने वाटाघाटीच अशक्य होतात. आता ट्रम्प जाऊन नवीन अध्यक्ष - बायडेन - येईल. तो या करारात अमेरिका परत

सामील व्हावी या मताचा आहे. तसे झाल्यास व्यापारी निर्बंध कमी होऊन अर्थव्यवस्था जरा सुधारेल असा मवाळ पक्षाचा अंदाज आहे.

त्यामुळे, याचवेळी ही हत्या करणे इस्रायलला सोयीचे ठरले, इराणशी कोणतेही संबंध नकोत या अमेरिकन गटालाही सोयीचे ठरते. इराणचा सध्याचा अध्यक्ष मवाळ मनाला जातो. त्याची मुदत पुढच्या जूनमध्ये संपते. त्यानंतर सत्तेवर येणारा जहाल पक्षी असू शकतो. बायडेनचे इराण-विषयक धोरण अधिक अवघड करावे, इस्राएल व सौदी अरेबिया यांना आपल्या अध्यक्षपदाच्या शेवटच्या दिवसांत मदत करावी असे गणित अमेरिकेतील इराण-विरोधी गटाचे असावे.

इराणमधील दुसरी घटना म्हणजे, रुहोल्ला झाम नावाच्या पत्रकाराला १२ नोव्हेंबरला फाशी देण्यात आली. त्याचा 'अपराध' म्हणजे तो सरकारवर टीका करत असे. त्याच्या इंटरनेटवरच्या पोस्ट्सना १० लाखाहून अधिक वाचक होते. महागाईविरोधात इराणमध्ये २०१७ला निदर्शने सुरु झाली, लगेचच ती सगळ्याच सत्ताधारी वर्गाविरुद्ध झाली. निषेध इराणचा सर्वेसर्वा आयतोल्ला खामेनीविरुद्धही होऊ लागला. ही निदर्शने कोठे होणार, कोण पोलीस ऑफिसर्स त्यावर देखरेख करणार हे हा पत्रकार त्याच्या इंटरनेटवरील चॅनेलवर आधीच प्रसृत करत असे. उच्चपदस्थ धर्मगुरूंचे आर्थिक भ्रष्टाचार, लैंगिक कृत्येही त्याने बाहेर काढली. असा पर्दाफाश कोणत्याच राजवटीला पचत नाही, इराणसारख्या मूलतत्त्ववादी राजवटीला तर नाहीच नाही. त्याच्यावर देशद्रोहाचा दिखाऊ खटला चालवून त्याला तातडीने फाशीही देण्यात आली. इराणमध्ये अशी शिक्षा होणारा हा शेवटचा पत्रकार नसेल. मुळात ही फाशी हा इराणचा पश्चिमेला आणि त्यांच्या स्वत:च्या जनतेला संदेश आहे. पश्चिमेला असा, की तुमचे मानवी हक्क आम्ही मानत नाही आणि स्वदेशीयांना – राजवटीवर टीका करू नका.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk